महाराष्ट्र राज्य व्यसनमुक्ती धोरणाच्या अनुषंगाने मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय व्यसनमुक्ती समितीची पुनर्स्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

शासन निर्णय क्रमांक : डीडीपी-२०१८/प्र.क्र. १०६ /सामासू

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १७ एप्रिल, २०१८

<u>वाचा</u> - १) शासन निर्णय गृह विभाग क्र. सीएलसी ११०१/सीआर१/भाग-२/ईएक्ससी - २, दि. ६ डिसेंबर, २००२.

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी-२००९/ सीआर १४९ / सुधार-१ दि. १७ ऑगस्ट, २०११

३) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. युटीए -२०११/ समिती/सीआर ३२६ /सुधार-१ दि.१ ऑक्टोबर, २०११

४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी -२०१३ / प्र.क्र ३६७ /२०१३/सुधार-१ दि.१८ ऑक्टोबर, २०१३

५) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी-२०१५ / प्र.क्र. ४०४ /सामासु दि. २३ मे २०१६

<u>प्रस्तावना -</u>

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मधील सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजनाव्यक्तिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याचे व्यसनमुमक्ती धोरण निश्चित करण्यात आले असून या विभागाच्या दिनांक १७ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहिर करण्यात आले आहे.

सदरहू शासन निर्णयात व्यसनमुक्ती बाबतची सद्य:स्थिती, उत्पादन विषयक धोरण, मद्यसेवन परवाना, दारुसेवन विषयक धोरण, वैध मद्य विक्री परवाना धोरण, वैध दारुबाबत जनतेचा अधिकार, प्रशासकीय जबाबदा-या, ग्राम सभेची कर्तव्ये, व्यसनमुक्ती समित्यांची रचना व कर्तव्ये, व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार, व्यसनमुक्तीसाठी प्रशिक्षण, व्यसनमुक्तीसाठी उपचार इत्यादीबाबत उहापोह करण्यात आला आहे. उपरोक्त शासन निर्णयान्वये व्यसनमुक्ती धोरण जाहिर करताना त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती नियामक मंडळ व इतर समित्या गठीत करण्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे. यात मंडळाची व समित्यांची रचना व कर्तव्ये विशद करण्यात आली आहेत.सद्यःस्थितीत अवैद्य दारु धंद्यावर बंदी आणण्यासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना

करणेबाबत गृह विभागाचा शासन निर्णय दि. ६ डिसेंबर, २००२ अस्तित्वात आहे. सदर शासन निर्णय हा या विभागाचा शासन निर्णय दि. १ ऑक्टोबर, २०११ अन्वये अधिक्रमित करण्यात आला आहे. तसेच दिनांक १७ ऑगस्ट, २०११ मधील तरतूदीनुसार राज्यस्तरीय व्यसनमुक्ती समितीची स्थापना दिनांक २३ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली होती. सदर शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येऊन समितीची पुनर्स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

दि. १७/०८/२०११ च्या शासन निर्णयान्वये व्यसनमुक्ती धोरणानुसार मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय व्यसनमुक्ती समितीच स्थापना दि. २३/०५/२०१६ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली होती. आता सदर शासन निर्णय अधिक्रमित करून या समितीची या शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे. सदर समितीची रचना व कार्य शासन निर्णय दि. १/१०/२०११ नुसार असतील.

राज्यस्तरीय व्यसनमुक्ती समिती

अ.क्र.	**नाव**	**पद**
१.	मा. मंत्री (सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती)	अध्यक्ष
२.	मा. मंत्री (राज्य उत्पादन शुल्क)	सदस्य
३.	मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती)	सदस्य
४.	मा. राज्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क)	सदस्य
५.	श्री. बाळासाहेब मुरकुटे (विधानसभा सदस्य)	सदस्य
६.	श्रीमती भारती लव्हेकर (विधानसभा सदस्य)	सदस्य
७.	श्री. भाई गिरकर (विधानपरिषद सदस्य)	सदस्य
८.	श्रीमती स्मिता वाघ (विधानपरिषद सदस्य)	सदस्य
९.	श्री. दिपक पाटील (सलाम मुंबई फांऊडेशन, मुंबई)	सदस्य
१०.	डॉ. सचिन परब, मुंबई	सदस्य
११.	श्री. ज्ञानेश्वर मुंडे,परभणी	सदस्य
१२.	श्रीमती अर्पिता मुंबरकर	सदस्य
१३.	श्री. विजय रावण मोरे, भोसरी, पुणे	सदस्य
१४.	श्रीमती प्रेमलता वाघ-सोनोने, बुलढाणा	सदस्य
१५.	श्री. धनंजय वैद्य, गोंदिया	सदस्य
१६.	श्रीमती अर्चना करनकाळे, उल्हासनगर, जि. ठाणे	सदस्य
१७.	प्रधान सचिव, गृह विभाग (विशेष)	पदसिध्द सचिव
१८.	प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग	पदसिध्द सचिव
१९.	प्रधान सचिव, वित्त विभाग	पदसिध्द सचिव
२०.	प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क	पदसिध्द सचिव

२१.	प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग	पदसिध्द सचिव
२२.	प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	पदसिध्द सचिव
२३.	आयुक्त, समाजकल्याण	सदस्य सचिव

सदर शासन निर्णय हा या विभागाचा शासन निर्णय दिनांक १७ ऑगस्ट, २०११ व १ ऑक्टोबर, २०११ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे. तसेच या समितीतील अशासकीय सदस्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र. प्रवास/१०१०/प्र.क्र. २/सेवा-०३ मार्च, २०१० मधील अनु.क्र. १२ मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१७२४००४४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.04.17 17:28:52 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई
३. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
११.सर्व विभागीय आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी.
१३.सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
१४.सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण विभाग
१५.सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
१६.निवड नस्ती, सामासु.